23-06-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 22-06-2025 23:00 Page 1



# मेणकुरे येथून पायीवारीचे पंढरपूरला प्रस्थान

## विठू माऊली च्या ओढीने पंढरपूरची पाऊले चालली | संपूर्ण गोवा भर भक्तीमय वातावरणनिर्मिती

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. २२ :** आस तुझी माऊली पाऊले चालती पंढरपूरची, नाचू गाऊ किर्तने न्हाऊ चंद्रभागा डोही, दर्शन घेईल गे माऊली, धन्य होईल जीव असे मुखी विठ्ठल नामाचा जयघोष आणि टाळ–मृदंगाच्या गजरात श्री ज्ञानेश्वर माऊली वारकरी संप्रदाय – गोवा ची पाचव्या पायी वारीला आज रविवार दिनांक २२ जून रोजी सकाळी मेणकुरे येथील श्री देवी माऊलीच्या चरणस्पर्श करुन , आशीर्वाद घेऊन सुरुवात झाली.

विठ्ठल भक्ती आणि श्रीक्षेत्र पंढरपूर, विठ्ठलाच्या दर्शनासाठी आतुरलेले डोळे , व्याकुळले मन अशा वातावरणात वारकरी आज रविवारी सकाळी ९.00 वाजता पायी वारी करीत पंढरपूरला जाण्यासाठी मार्गस्थ झाले.

आज या पायी वारीला निरोप आणि शुभेच्छा देण्यासाठी गोव्याचे राज्यसभा खासदार सदानंद शेट तानावडे, डिचोली चे आमदार डॉ चंद्रकांत शेट्ये , मेणकुरे ग्रामपंचायत सरपंच उमेश शेटये, श्री देवी माऊली देवस्थान समिती अध्यक्ष सदानंद नाईक आणि पत्रकार दिलीप देसाई तसेच गाव जालो जाण्टो विश्व रिकॉर्ड नाटकाचे सर्वेसर्वा राजदिप नाईक व मोठ्या संख्येने वारकऱ्याचे नातलग निरोप देण्यासाठी श्री देवी माऊली मंदिर क्षेत्रात उपस्थित होते.

यावेळी आमदार डॉ चंद्रकांत शेटये म्हणाले की भक्ती आणि श्रद्धा त्यात विठ्ठल दर्शनाची आस लागल्याने आनंददायी वातावरण निर्माण झाले आहे. संपूर्ण गोव्यात व त्यात डिचोलीत भक्तिमय वातावरण बनले असून, वारीत युवा वर्ग मोठ्या प्रमाणात सहभागी होत असल्याने आपल्या संस्कृतीचे, आपल्या रितीरिवाजाचे जतन तर होणारच तसेच भावी पिढीत आपल्या धर्माची बीजे रुजवली जातील जेणेकरून भागवत धर्माची पताका निरंतर चालू राहील यात शंकाच नाही.

विठ्ठलाची आस आणि ध्यास लागल्यामुळे ही पावले पंढरपुराला चालली आहेत, त्यांचे जीवन सुखमय होवो हीच सदिच्छा तसेच त्यांचा प्रवास सुखकर होवो असे सांगून खासदार सदानंद शेट तानावडे यांनी शुभेच्छा देत निरोप दिला.

तसेच मेणकुरे ग्रामपंचायतचे सरपंच उमेश शेट्ये, श्री माऊली देवस्थान अध्यक्ष सदाशिव नाईक , ज्येष्ठ पत्रकार दिलीप देसाई तसेच नाट्य कलाकार व निर्मितीकार राजदिप नाईक यांनीही शुभेच्छा दिल्या .



मेणकुरे येथून श्री ज्ञानेश्वर माऊली वारकरी संप्रदाय ची निघालेली पायी वारी

यावेळी मान्यवरांचा चंद्रकांत वंसकर ,सुरेंद्र गाड, अभिजीत तेली, दादू नाईक, मुकुंद लामगावकर व भगवान परब यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सल्लागार प्रभाकर नाईक यांनी केले तर सचिव चंद्रकांत वसकर त्याने आऔभार मानले. तसेच आमदार डॉ शेटये यांच्या हस्ते पाच महिने नर्मदा परिक्रमा पूर्ण केलेले देवानंद नाईक यांनाही सन्मानित करण्यात आले.

सुरुवातीला खासदार तानावडे, आमदार डॉ शेटये यांचे मंदिरात प्रवेश होताच ज्ञानेश्वर माऊली वारकरी संप्रदाय गोवा मेणकुरे चे अध्यक्ष देवानंद नाईक स्वागत करण्यात आले तर नंतर त्यांच्या हस्ते श्री माऊली देवीला पंचायत समिती ओवाळून व पादुकांचे पूजन झाल्यानंतर महाआरती झाली. तसेच चंद्रकांत वसकर यांनी वारी निर्विघ्नपणे पार पाडावी यासाठी सार्वजनिक गाऱ्हाणे घातले. तदनंतर टाळमृंदगाच्या गजरात विठू माउली च्या जयघोषात मंदिरातून आमदार डॉ शेटये यांच्या हस्ते ज्ञानेश्वर माऊली च्या पादुका रथा मध्यें स्थानापन्न केल्यानंतर पायीवारीला सुरुवात केली.

या पायी वारी चे दिंडीप्रमुख देवानंद नाईक यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या दिंडीत अभिजीत तेली व सुरेंद्र गाड हे उपादिंडी प्रमुख आहेत. तसेच बाबनी शेटकर ( शि.वोली) व किशोर नाईक ( कुमयामळा – साळ ) हे चोपदार तर डॉ. संजय तांबे व डॉ. सुनिता नागवेकर हे पुर्ण वारीत आरोग्याच्या सेवेला तत्पर आहेत. संस्थेचे सचिव चंद्रकांत वंसकर यांची पूर्णतः देखरेख आहे. या दिंडीत ६0 महिलांसह एकूण २00 तर सेवेकरी २0 तर ९ वाहन वाहक व इतर मिळून २५0 जण टाळ मृदंगाच्या साथीने हाती दिंडी पताका घेऊन विठ्ठल नामाचा जयघोष करीत वारी चालली . गोव्यातील सर्वात मोठी वारी आहे. ही वारी धुमासेमार्गे साळ येथे आल्यानंतर श्री महादेव – भूमिका देवतांचे दर्शन घेतले. येथील श्री महादेव भूमिका ग्रामस्थ – साळतर्फे नाश्त्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी साळ देवस्थान चे अध्यक्ष कालिदास राऊत, सचिव विशाल परब, महाजन अशोक परब , सुरेश परब यांनी वारीचे स्वागत केले तर सुहासिनीनी माऊलीचे औक्षण केले. तसेच महादेव मंदिरात चहापान करून तेथील भक्तांच्या गाठीभेटी घेतल्या . साळ खालचावाडा, मधलावाडा ,वरचावाडा येथे भक्तांच्या भेटी घेतल्यानंतर प्रस्थान केले.

पान १ वरून

### विस्मरणात गेलेल्या हस्तलिखितांचा शोध सुरू

मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी २०२५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अभिलेखागार विभागांतर्गत हस्तलिखितांसाठी स्वतंत्र शाखा स्थापन करण्याची घोषणा केली होती. यानंतर राज्य सरकारने मे महिन्यात गोवा राज्य हस्तलिखित अभियान स्थापनेची अधिसूचना जारी केली.

ही मोहिम केवळ नाजूक दस्तऐवज वाचवण्याबाबत नाही, तर गोव्याच्या इतिहासातील आवाज, स्मृती व बौद्धिक वारसा जपण्याचा एक प्रयत्न आहे,असे विभागाच्या एका अधिकाऱ्याने स्पष्ट केले.

ही मोहीम अधिक व्यापक आणि फलदायी व्हावी यासाठी विभागाने नागरिक, संस्था व कुटुंबीयांना पुढाकार घेऊन त्यांच्या संग्रहील दस्तऐवज तपासणीसाठी खुल्या करण्याचे आवाहन केले आहे. राज्याचा विसरलेला वारसा उजेडात आणण्यासाठी ही मोहीम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे विभागाने सांगितले.

## पाकिस्तानने बदलले रंग ; दाखवला खरा चेहरा

**नवी दिल्ली, दि. २२ :**

इस्रायल आणि इराणमध्ये सुरू असलेल्या युद्धाची तीव्रता वाढतच चालली आहे. त्यामध्येच अमेरिकेने इराणमधील तीन प्रमुख अणु ठिकाणांवर हल्ले केल्यामुळे खळबळ उडाली आहे. इस्रायलने शुक्रवारी रात्रभर इराणमधील विविध ठिकाणांवर हवाई हल्ले केली होती. इराणच्या विरोधात अमेरिका मैदानात उतरल्याचे बघायला मिळाले. आता पाकिस्तानने या हल्ल्यांचा निषेध केला आहे. एका दिवसातच पाकिस्तानने आपला रंग बदलला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांना नोबेल पुरस्कार मिळावा, असा प्रस्ताव पाकिस्तानकडून ठेवण्यात आला आणि आज पाकिस्तानने अमेरिकेने केलेल्या हल्ल्यांचा निषेध केलाय.

पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने सोशल मीडियावर निवेदन जारी करत अमेरिकेने आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन केल्याचे म्हटले आहे. संयुक्त राष्ट्र चार्टरनुसार इराणला आत्मरक्षणाचा अधिकार आहे, असेही पाकिस्तानने म्हटले आहे. एकप्रकारे अमेरिकेला मोठा आहेरच आता पाकिस्तानकडून देण्यात आला. या हल्ल्यामुळे गंभीर परिणाम होतील, अशी चिंता पाकिस्तानने व्यक्त केली आहे. हे युद्ध लवकरात लवकर थांबवावे, असेही त्यांनी आवाहन केलंय.

पाकिस्तान च्या परराष्ट्र मंत्रालयाने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत म्हटले की, अमेरिकेने एअर स्ट्राईक करून आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन केले आहे. इराणला स्वतःचे संरक्षण करण्याचा पूर्ण अधिकार आहे. यासोबतच त्यांनी भीती देखील व्यक्त केलीये. पाकिस्तानने डोनाल्ड ट्रम्प यांना नोबेल पुरस्कार मिळावा यासाठी प्रस्ताव देखील ठेवला होता. पाकिस्तान सरकारने २०२६ च्या नोबेल शांतता पुरस्कारासाठी डोनाल्ड ट्रम्प यांच्या नावाची औपचारिक शिफारस केली होती.

**IN THE COURT OF THE MAMLATDAR OF PERNEM TALUKA, PERNEM -GOA.**

**Case No. MAM/PER/TNC/Decl/1/2025.**
Mr. Nilesh Dharma Patekar, H.No.370/B, Oxelbag, Dhargal, Pernem, Goa.
...Applicant
V/S
1. Smt. Rajashree Dharma Patekar, H. No. 370, Oshalbag Dhargal, Pernem Goa. 2. Shri Eknath Dharma Patekar, s/o late Dharma Krishna Patekar. II.No.370, Oshalbag Dhargal, Pernem Goa. Age 51 years, married business, Indian National and his wife 3. Ishita Eknath Patekar, Aged 51 years, housewife, Indian National, House No.370, Oshalbag Dhargal, Pernem Goa. 4. Darshana Dharma Patekar (a Darshana Siddharth Kudnekar, Daughter of Late Dharma Krishna Patekar Age 39 years, house wife, Indian National, And her husband. 5. Shri Siddharth R. Kudnekar, Son of late R. Kudnekar Age 40 years, Business, Indian National. Both r/o Near Railway Station, Margao Goa. 6. Shri Chandan Dharma Patckar, s/o late Dharma Krishna Patekar aged 36 years, married, service, Resident of house no.370, Indian National. 7. Suraksha Chandan Patekar, Wife of Chandan Patekar, Age 35 years, Resident of house no.370, Indian National. 8. Jairam Balkrishna Prabhudesai, H.No. 128, Gaowada, Dhargal, Pernem, Goa 403513. 9. Ghanashyam Yeshwant Prabhudesai, H.No. 129, Gaowada, Dhargal, Pernem, Goa 403513. 10.Kashibai Pandurang Prabhudesai, H.no.131, Gaowada, Dharga Pernem, Goa 403513 11.Enterprise Valu Enhancement (India) Pvt Ltd. 3/D-2, Court Chambers, 35, New Marine Lines, Mumbai, Maharashtra, India 400020. 12. Delta Corp Limited Office at A) 10, Kumar Place, 2408, General Thimayya Road, Pune, Maharashtra 411001. B) House No.850, Delta Centre, Porvorim, Goa. C) 16/A Ali Chambers Nagindas, Master Road Fort, Mumbai 400001. 13. Dhondu Sakharam Patekar, H. No.443, Headland Sada, Mormugao, Goa-403804. 14. Lakshmi Dhondu Patekar, H. No. 443, Headland Sada, Mormugao, Goa-403804. 15. Ramchandra Sakharam Patekar, H.No.443, Headland Sada, Mormugao, Goa-403804. 16. Kamini Ramchandra Patekar H.No.443, Headland Sada, Mormugao, Goa-403804. 17.Tulshidas Sakharam Patekar, H.No.550, Sancoale, Mormugao, Goa-403804. 18. Vinanti Tulshidas Patekar H. No.550, Sancoal, Murmugao, Goa 403513. 19. Saraswati Bapu Gadekar Oxel Bhag, Dhargal, Pernem, Goa 403513 20. Sakharam Yeshwant Patekar, Oxelbhag, Dhargal, Pernem, Goa 403513. 21. Suhasini Sakharam Patekar, Oxelbhag, Dhargal, Pernem, Goa 403513 22. Nitin Yeshwant Patekar, H. No.369, Oxelbag, Dhargal, Pernem, Goa 403513 23. Nikita Nitin Patekar H.No. 369, Oxelbag, Dhargal, Pernem, Goa 403513. ...Respondents.
To,
The Opponent Nos. 8, 9, 10, 13, 14, 15, 16 and 17.

**NOTICE UNDER ORDER V RULE 20 (1-A) OF CPC 1908**

WHEREAS, the above named applicants have moved an application for Tenancy Declaration under section 7 of Goa Daman and Diu Agricultural Tenancy Act, 1964 in this court against you with respect to the property surveyed under Survey No. 280/1 situated in the village Dhargal, Pernem-Goa.

And whereas the notices were sent to the opponent No. 8,9,10, And whereas the notices were 13,14,15,16 and 17 by register A.D. has been returned by the postal authorities with remarks "Party expired, party left, Addressee cannot be located etc".

And whereas the applicant vide his application dated 05/06/2025 has stated that the addresses mentioned in the title cause is the only last known address of the above said opponents available with the applicant so also the applicant is not aware of any surving legal heirs of the deceased opponents, therefore they prayed to serve the above opponent by way of substitute service by publishing notice in the daily newspaper.

And whereas after considering the request of the applicant, I have come to the conclusion that this is a fit case for publishing the notice in any local newspaper.

Therefore notice is hereby given under order 20(1-A) to you to appear in this court on **24/06/2025 at 10.30 a.m.** in person or through duly authorized agent failing which ex-parte order shall be passed and the matter shall be decided in your absence.

Given under my hand and seal of this court of this 06th day of June, 2025.

Sd/- (**Ranjeet R. Salgaonkar**)
Mamlatdar of Pernem Taluka,
Pernem Goa.
SEAL

## खरपाल येथे जागतिक योग दिन उत्साहात साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. २२ :** सरकारी प्राथमिक विद्यालय – खरपाल येथे २१ जून २०२५ रोजी जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पद्मनाभ पीठ संत समाज – डिचोलीचे उपाध्यक्ष श्री एकनाथ लामगावकर, सचिव प्रज्ञा रघुनाथ परब, योगशिक्षक हरेश मोहन करमळकर, योगशिक्षिका काशी गावकर, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ प्रज्ञा दिनेश दामले, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष निलेश गावस, शिक्षिका अर्चना राऊत, शिक्षक गौरेश परवार व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने करण्यात आली. यावेळी योगशिक्षक हरेश मोहन करमळकर यांनी विद्यार्थ्यांना विविध आसने व प्राणयाम शिकविले. काशी गावकर यांनी विद्यार्थ्यांसोबत प्रात्यक्षिक करून दाखविली. शाळेच्या मुख्याध्यापिका प्रज्ञा दिनेश दामले यांनी सर्वांना योगदिनाचे महत्त्व सांगितले.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रद्धा पणसुलकर व आभार प्रदर्शन अर्चना राऊत यांनी केले.



खरपाल – येथील सरकारी प्राथमिक शाळेत योगासने करताना विद्यार्थी व शिक्षक वर्ग.

## बांदा श्री विठ्ठल मंदिरात २८ जुनपासून वीणा सप्ताह



■ टीम दैनिक हेराल्ड

**बांदा दि. २२ :** बांदा येथिल श्री विठ्ठल मंदिरात प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही हरिनाम वीणा सप्ताहाला शनिवार दि. २८जुन पासुन प्रारंभ होत आहे.

या सप्ताहानिमित्त मंदिरात सात दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दि. ५ जुलै रोजी सप्ताहाची सांगता होणार असून रविवार दि. ६ जुलै रोजी आषाढी एकादशीचा भव्य सोहळा होणार आहे. या वीणा सप्ताहाच्या नियोजनासाठी ज्येष्ठ भजनकर्मी तथा वीणा सप्ताह नियोजनप्रमुख प्रकाश उर्फ भाऊ मिशाळ यांच्या अध्यक्षतेखाली

पारप्रमुख व सेवेकरी मंडळींची शुक्रवारी श्री विठ्ठल मंदिरात बैठक झाली. यावेळी संदेश पावसकर, सुदन केसरकर, भाऊ वाळके, सुनील नाटेकर, विनीत पडते ,निलेश महाजन, साईराज पावसकर, श्रीप्रसाद वाळके ,अजय महाजन, मंगलदास साळगांवकर, प्रथमेश गोवेकर, आशुतोष भांगले, अजय परब, मंथन विरनोडकर, अचल पावसकर आदी सेवेकरी उपस्थित होते.

यावेळी निश्चित केलेले सप्ताहाचे पार पुढील प्रमाणे आहेत.

१) शनिवार दि. २८ जुन आळवाडा –विनीत पडते, २) रविवार दि. २९ जुन रोजी निमजगा गवळीटेंब– संदेश पावसकर, ३) सोमवार दि. ३0 जुन रोजी हॉस्पिटल कट्टा – उमेश काणेकर, भाई शिरसाट ४) मंगळवार दि.१ जुलै रोजी गांधी चौक – सुदन केसरकर ५) बुधवार दि. २ जुलै रोजी मारुती गल्ली– दत्तप्रसाद पावसकर ६) गुरुवार दि. ३जुलै रोजी देऊळवाडी– श्रीप्रसाद वाळके ७) शुक्रवार* दि.४ जुलै रोजी उभाबाजार– निलेश महाजन शनिवार दि. २८ जुन रोजी सकाळी १२ वाजता श्री विठ्ठल नामाच्या गजरात भाविकांच्या उपस्थितीत वीणा घेऊन सप्ताहास सुरुवात होईल. शनिवार दि. ५ जुलै रोजी दुपारी १२ वाजता सप्ताहाची सांगता होईल.

सप्ताहानिमित्त दररोज नामस्मरण, भजन, गजर, सायंआरती तसेच सायंकाळी ५ ते ६.३0 स्थानिक महिलांची भजनसेवा व रात्री १0 ते १२ या वेळेत स्थानिक नित्य भजनकर्मींची भजनसेवा होईल. भाविकांनी या सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन श्री विठ्ठल मंदिर ,बांदा च्या वतीने करण्यात आले आहे.

## गोव्यात वारीची परंपरारूढ होत असताना संस्कृतीचे होतेय जतन युवा पिढी घेतेय सहभाग



■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २२ :** हातात टाळ घेत विठुनामाचा गजर करीत मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांना आमोणा साखळी येथून पंढरपूर येथे पायी निघालेल्या अमरावती आमोणा येथील ओम नमो ज्ञानेश्वर माऊली वारकरी मंडळाच्या पायी वारीला निरोप व शुभेच्छा दिल्या. यावेळी मुख्यमंत्रीही वारकऱ्यांसमवेत सुमारे एक किलोमीटर अंतर पायी चालून त्यांनी या वारीत आपली सेवा बजावली.

पंढरपूर वारीची परंपरा गोव्यात रूजू होऊन मोठी होत असतानाच आमच्या संस्कृतीचे जतन होत आहे. व हि परंपरा नवीन पिढीकडे जात असल्याचे पाहून समाधान होत आहे. वारी केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर गोव्यातही वारकरी वाढतच आहेत. आज वीसच्या वर वाऱ्या व २ हजारपेक्षा जास्त वारकरी पायी पंढरपूरला जातात. हि मोठी बाब आहे, असे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी यावेळी म्हटले

. तसेच पंढरपूर येथे गोवा सरकार गोव्यातील भाविकांसाठी गोवा भवन लवकरच साकारणार असल्याचा त्यांनी यावेळी पुनरूच्चार केला.

वारकरी मंडळाचे प्रमुख काशिनाथ माथो यांनी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांचे स्वागत करून मुख्यमंत्री डॉ. सावंत व सौ. सुलक्षणा सावंत यांचे सदैव आध्यात्मिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रमांना सहकार्य व सहभाग असतो.

## केशव स्मृती उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये योगदिन साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

**दाबोळी, दि. २२:** केशव स्मृती उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये एनएसएसच्या अंतर्गत आंतरराष्ट्रीय योगदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी नेव्ही चिल्ड्रन स्कूलच्या शिक्षिका तसेच योगप्रशिक्षक सुवर्णा साळुंके यांचे मार्गदर्शन लाभले. मान्यवरांच्याहस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. योगप्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. योग प्रशिक्षक सुवर्णा साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध योगासने व सूर्यनमस्कार यांची प्रात्यक्षिके केली. प्रत्येक व्यक्तीने योग केला पाहिजे. योगामुळे शरीर तंदुरुस्त राहते. त्याचबरोबर आपले मानसिक, तसेच शारीरिक आरोग्य सुधारते, असे उदगार प्राचार्य शंकर गावकर यांनी मुलांना मार्गदर्शन करताना काढले. विद्यार्थी तसेच शिक्षकांनीही आवडीने योगासने करण्यासाठी आपला सहभाग दर्शवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका श्रद्धा साळगावकर यांनी केले, तर आभारप्रदर्शन गौरवी रायकर यांनी केले.



योग प्रात्यक्षिके करताना विद्यार्थी–शिक्षक.

## संत समाज तोरसे मोपद्वारे आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५ साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २२ :** अध्यात्म शिरोमणि, पद्मश्री विभूषित सद्गुरु ब्रह्मेशानंदाचार्य स्वामीजींच्या दिव्य कृपाशीर्वादाने श्री दत्त पद्मनाभ पीठ, सद्गुरु योग गुरुकुल व सत्गुरु फाउंडेशन तथा राष्ट्रीय आयुष मिशन – आयुष सेल, आरोग्य सेवा संचालनालय – गोवा सरकार यांच्या संयुक्त विद्यमानाने संत समाज संत समाज तोरसे मोप द्वारे आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५ कार्यक्रम शहीद रामसिंग मेमोरियल सरकारी हायस्कूल तोरसे येथे संपन्न झाला, प्रथम मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन, सद्गुरू माऊली प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून सद्गुरू नामावलीने उद्घाटन करण्यात आले.

या योगदिन *कार्यक्रमाला प्रमुख अतिथी तोरसे जिल्हा पंचायत सदस्या सौ .सिमा रामा खडपे, डॉाक्टर रोशनी तुळसकर, शिक्शिका मनक्ष्वी गोवेकर , शिक्षक साईस आरोलकर, पत्रकार श्री ऊमेश गाड , संत समाज* तोरसे मोप अध्यक्ष श्री लाडू ऊर्फ बाळू राऊळ,, योग शिक्षक श्री गुणाजी आरोस्कर , सह योगशिक्षक कुमार अद्वैय परब, आदि. मान्यवर उपस्थित होते.

प्रमुख अतिथी तोरसे जिल्हा पंचायत सदस्या सौ .सिमा रामा खडपे, डॉाक्टर रोशनी तुळसकर यांनी योगा विषयी मार्गदर्शन करून पुज्य सद्गुरू ब्रह्मेशानंद स्वामीजी , तपोभूमी कार्य व संत समाज पातळीवरील कार्याची प्रशंसा केली, तसेच शिक्शिका मनक्ष्वी गोवेकर ,पत्रकार श्री ऊमेश गाड , यांनी मनोगत व्यक्त करुन शुभेच्छा दिल्या.

योग प्रशिक्षक श्री गुणाजी आरोस्कर व सह योगशिक्षक अद्वैय परब यांच्या मार्गदर्शनाखाली योग प्रात्यक्षिके संपन्न झाली,

या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यक्ष श्री लाडू ऊर्फ बाळू राऊळ, स्वागत शिक्षिका सिंथीया गावकर व आभार प्रदर्शन शिक्षक साईश आरोलकर यांनी केले.

या योगदिन कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी, संत समाज पुरोहित श्री एकनाथ आईर, महिला पुरोहितत सौ. सुचिता शेलार, सचिव श्री एकनाथ आईर, सदस्य श्री प्रकाश कोरगावकर, भानुदास राऊळ, अंकुश कनोळकर, सोहंम परब, नारायण तोरसकर, रोहीणी तुळसकर व इतर शिक्षक मंडळींच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला व शांतीपाठाने कार्यक्रमाची सांगता झाली.

